**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०२ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या ५ जून रोजी नागपूर- मुंबई महामार्गावरील ७६ किमी लांबीच्या शेवटच्या टप्प्यातल्या समृद्धी महामार्गाचं होणार उद्घाटन.
2. विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी असणं आवश्यक असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांच प्रतिपादन.
3. देशातल्या सहा कोटींहून अधिक शेतकऱ्यांना डिजिटल ओळखपत्रं मिळाल्याची केंद्र सरकारची माहिती.
4. अमरावतीत प्रतिबंधित एचटीबीटी बियाणं मोठ्या प्रमाणात जप्त.

------------------------------------------

**समृद्धी महामार्ग**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या ५ जून रोजी नागपूर- मुंबई महामार्गावरील ७६ किमी लांबीच्या शेवटच्या टप्प्यातल्या समृद्धी महामार्गाचं उद्घाटन करण्यात येणार आहे. नाशिकच्या इगतपुरी ते ठाण्यातल्या आमणे यांना जोडणारा हा ७०१ किमी लांबीच्या हाय-स्पीड कॉरिडॉरचा शेवटचा टप्पा आहे. हा टप्पा पूर्ण झाल्यामुळे समृद्धी महामार्गावरुन आता नागपूर ते मुंबई थेट प्रवास करता येणार असल्याची माहिती राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

------------------------------------------

**विकसित शेती**

विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी असणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केलं. ते आज बिहारमधल्या मोतिहारी इथं शेतऱ्यांचं जीवनमान उंचावण्याबाबत आयोजित केलेल्या चर्चासत्रात बोलत होते. देशभरात १६ हजार शास्त्रज्ञ थेट शेतकऱ्यांशी संवाद साधत असून प्रयोगशाळा ते शेती असा सेतू केंद्र सरकारनं प्रस्थापित केला असल्याचं चौहान यांनी सांगितलं.

*(होल्ड बाईट -शिवराजसिंह चौहान 38 सेकंद)*

*तो ये सारे वैज्ञानिक लैब में काम करते थे। लैब अपनी प्रयोगशाला और किसान खेत में मेहनत करता था। ये लैब और खेत दो अलग अलग हैं  कभी मिलते ही नहीं। अब वैज्ञानिक शोध कर रहे है और किसान खेती कर रहा है। दोनों कभी मिलते ही नहीं थे, तो हमने सोचा अगर इन दोनों का मिलन हो जाए गंगाजी जमुनाजी जैसा तो खेती चमक जाएगी, बदल जाएगी। जो जानकारी वैज्ञानिक के पास है वो किसान तक पहुंचे। प्रधानमंत्री जी का भी ये संकल्प है तो हमने तय किया ये सारे वैज्ञानिक प्रयोगशाला से निकल के गांव, गांव, किसानों के बीच जा रहे हैं।*

उत्पादनात वाढ करणं, उत्पादन खर्च कमी करणं, आणि शेतमालासाठी दर निश्चित करणं यावर ते काम करत असल्याचं कृषीमंत्री म्हणाले. सरकार डाळी, तेलबिया यांच्या लागवडीला प्रोत्साहन देत असून शेती अधिक फायदेशीर करणं हा सरकारचा उद्देश आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं. भारतीय अर्थव्यवस्थेची सर्वात मोठी शक्ती शेती आहे, असं चौहान म्हणाले.

-------------------------------------------

एकशिक्षकी शाळा

विदर्भात 1997 पासून सुरू असलेली कैलासवासी लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था संपूर्ण विदर्भात आज 1 हजार 35 एक शिक्षकी शाळांचे संचालन करीत आहे. या शाळांमध्ये ३५ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात आता संपूर्ण महाराष्ट्रात पाच हजार एक शिक्षकी शाळा सुरू करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत काल कै.लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या कार्यकारी मंडळाची बैठक झाली. बैठकीत संस्थेच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. संस्थेने यापुढे शैक्षणिक विकासाशिवाय, स्वयंरोजगार, स्वयंकौशल्य विकास, तंत्र शिक्षण, गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी निवासी वसतिगृह आदी कामांवर पण लक्ष केंद्रित करून ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रातील सशक्त विद्यापीठ म्हणून नावलौकिक मिळवावा, अशी अपेक्षा गडकरी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

-------------------------------------------

मराठी पत्रकारिता

अमरावती येथील भारतीय जन संचार संस्थान आयआयएमसी च्या मराठी पत्रकारिता डिप्लोमा अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा सीईटी शुक्रवार ६ जून रोजी होणार असून यासाठी नोंदणी अर्ज गूगल फॉर्मद्वारे दिनांक ५ जून पर्यंत भरता येईल. प्रवेश परीक्षा ६ जून रोजी सकाळी ११ वाजता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार भवनातील आयआयएमसीत होणार आहे. परीक्षेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थांनी  गुगल लिंकद्वारे नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

------------------------------------------

मालवाहतूक उत्पन्न

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने मे 2025 मध्ये मालवाहतूक क्षेत्रात मोठी प्रगती साधत एकूण 1 हजार 121 रेक्स लोड करण्यात यश मिळवले असून, यातून 470 पूर्णांक 68 कोटी रुपयांचे मालवाहतूक उत्पन्न मिळवलं आहे.

------------------------------------------

डिजिटल ओळखपत्रं

देशातल्या सहा कोटींहून अधिक शेतकऱ्यांची डिजिटल ओळखपत्रं बनवण्यात आली आहेत. केंद्र सरकारने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीत या माहितीचा समावेश आहे. या ओळखपत्रांद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदी, पशुधन, पिकांची माहिती आणि त्यातून मिळालेल्या उत्पन्नाची नोंद केली जाणार आहे. या ओळखपत्रांचा उपयोग पीकविमा तसंच प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेच्या लाभात होणार आहे. उत्तर प्रदेशात सर्वाधिक म्हणजे १ कोटी ३० लाख शेतकऱ्यांची ओळखपत्र तयार करण्यात आली आहेत. महाराष्ट्रात ९९ लाख, मध्य प्रदेशात ८३ लाख, आंध्र प्रदेशात ४५ लाख, गुजरातमध्ये ४४ लाख, तर राजस्थानात ७५ लाख शेतकऱ्यांची डिजिटल ओळखपत्रं तयार करण्यात आली आहेत.

------------------------------------------

बियाणे जप्ती

कृषी विभागाच्या पथकानं अमरावतीतून प्रतिबंधित एचटीबीटी बियाण्याची अडीच हजार पाकिटं जप्त केली आहेत. जप्त केलेल्या या बियाण्यांची किंमत २५ लाख रुपये आहे. गुजरातमधल्या अहमदाबादमधून अमरावतीमार्गे नागपूरला जाणाऱ्या खासगी बसच्या तपासणीत हा साठा आढळून आला. याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास सुरू आहे. यापूर्वी कृषी विभागाच्या पथकानं

जिल्ह्यात विविध ठिकाणी अनधिकृत एचटीबीटी बियाण्यासंदर्भात सहा कारवाया केल्या असून त्यापैकी ५ कारवायांमधे जप्त केलेला माल गुजरातमधून आल्याचं उघडकीला आलं आहे.

-------------------------------------------

बोन मॅरो

विदर्भातील सिकल सेल आणि थॅलेसेमिया ग्रस्त रुग्णांना नजीकच उपचारांची सोय व्हावी आणि त्यांचे उपचारांसाठी मुंबईवर असलेले अवलंबित्व कमी व्हावे यासाठी एम्स नागपूर येथे बोन मॅरो ट्रान्सप्लांट युनिट सुरू करण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. या संकल्पनेस सकारात्मक प्रतिसाद देत एसटीपीसीने या युनिटसाठी अर्थसहाय्य दिले आहे. याबाबतच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. या कराराअंतर्गत एनटीपीसी त्यांच्या सामाजिक दायित्व निधी (CSR) उपक्रमांतर्गत एम्स नागपूरला आर्थिक मदत करणार आहे. ही मदत बोन मॅरो ट्रान्सप्लांट (BMT) युनिट उभारणी आणि गरजू रुग्णांसाठी उपचार सहाय्यासाठी वापरण्यात येणार आहे. या केंद्राचा फायदा विदर्भातील लोकांसोबत विशेषतः लहान मुलांच्या उपचारासाठी होणार आहे.

-------------------------------------------

हत्ती पथक

चंद्रपूर जिल्ह्यात दाखल झालेल्या रानटी हत्तींवर नजर ठेवण्यासाठी आणि मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वनविभागाने त्रिस्तरीय पथकांची निर्मिती केली आहे. या रानटी हत्तींनी ताडोबापर्यंत धडक मारल्याने वनविभाग ॲक्शन मोडवर आला असून याबाबत काल उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. बैठकीत गाव, रेंज आणि जिल्हास्तरीय पथक गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. हत्ती दाखल होण्याची शक्यता असलेल्या संभाव्य गावांमध्ये जनजागृती केली जाणार असून GIS सेल आणि थर्मल ड्रोन आणि थर्मल कॅमेऱ्यांच्या मदतीने हत्तींच्या हालचालींचा अंदाज घेऊन तो संबंधित अधिकाऱ्यांना आणि ग्रामस्थांना कळविला जाईल.

-------------------------------------------

पालखी

विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत गजानन महाराजांची पालखी आज विठू नामाचा गजर करत  पंढरपूरच्या दिशेने विठ्ठल दर्शनासाठी मार्गस्थ झाली आहे. टाळ मृदंग घेऊन अश्व आणि

गजासह 700 जण पायदळवारीमध्ये सहभागी झाले आहेत. पालखीचे हे 56 वे वर्ष आहे. संत गजानन महाराजांची पालखी 725 किलोमीटरचा पायी प्रवास करून 33 दिवसानंतर 4 जुलै रोजी पंढरपूरमध्ये दाखल होणार आहे. त्यानंतर पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या सोहळ्यात सहभागी होणार आहे.

------------------------------------------

आयपीएल

इंडियन प्रिमियर लीग-आयपीएल क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना उद्या अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर रॉयल चल्लेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज संघादरम्यान संध्याकाळी 7.30 वाजता होणार आहे. काल झालेल्या दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात पंजाबच्या संघाने मुंबई इंडियन्सचा पाच गडी राखून पराभव करत अंतिम फेरी गाठली. मुंबईच्या संघाने प्रथम फलंदाजी करत निर्धारित षटकात २०३ धावा केल्या. पंजाब किंग्जने पाच गडी गमावत हे लक्ष्य साध्य केलं.

------------------------------------------

शून्य अपघात

महाराष्ट्राला वीज अपघातांपासून मुक्त करण्याच्या ध्येयाने, महावितरणने आपला 20 वा वर्धापन दिन 'शून्य अपघात महावितरण...शून्य अपघात महाराष्ट्र...' या संकल्पनेसह 'विद्युत सुरक्षा सप्ताह' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली आहे. येत्या 6 जून रोजी महावितरणच्या स्थापनेला दोन दशके पूर्ण होत असल्याने, 1 ते 6 जून 2025 या काळात हा विशेष सप्ताह राज्यभर राबवला जात आहे. या अंतर्गत, आजपासून नागपूर परिमंडळातील सर्व उपविभागांनी रहिवासी भाग, बाजारपेठा, सार्वजनिक वाहतूक केंद्रे आणि गर्दीच्या ठिकाणी वीज सुरक्षेविषयी व्यापक जनजागृती मोहीम हाती घेतली आहे.

------------------------------------------

प्रताप सरनाईक

मराठी भाषा आणि महाराष्ट्राचा अपमान करण्याबद्दल मंत्री प्रताप सरनाईक यांना बडतर्फ करा, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं केली आहे. महाराष्ट्राची अधिकृत भाषा मराठी असून मराठी भाषेसाठी आणि मराठी लोकांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष कायम संघर्ष करत आला असल्याचं पक्षाच्या मुखपत्रात म्हटलं आहे. मंत्री प्रताप सरनाईक यांनी मीरा-भायंदर भागात आल्यावर आपल्या तोंडातून आपसूक हिंदी बाहेर पडते, अशा

**अर्थाचं वक्तव्य केलं होतं. त्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ही टीका केली आहे.**

**--------------------------------------------**

**हवामान**

**नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रानं दिलेल्या माहितीनुसार गेल्या २४ तासांत विदर्भात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. पुढील दोन दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. आज विदर्भातील किमान तापमानात किरकोळ बदल नोंदवण्यात आला. चंद्रपूरमध्ये सर्वाधिक कमाल तापमान ३९ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. दरम्यान, पुढील एका तासात वर्धा, भंडारा, गोंदिया आणि नागपूर जिल्हयांतील काही भागांमध्ये विजांसह मेघगर्जना होऊन सोसाट्याचा वारा वाहण्याची तसंच हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.**

**--------------------------------------------**